
मुक्तागिरी

■ मंगळवार, दि. ११ जानेवारी २०२२
www.emuktagiri.in

संमिश्र

# जातीव्यवस्था व आपल्या माणसांनी लावलेला सापळा दाखविणारी कविता 'सापळा'

संविधानिक लोकशाही अंमलबजावणी होऊन ७० वर्षे उलटून गेली तरी अजूनही ही विषम व्यवस्था बदलत नाही. उत्तरोत्तर भारतीय समाजातील जाती -पातींचे राजकारण सुरु असून लाभार्थी होण्यासाठी स्वतःला आम्ही मागासवर्गीय आहोत,असे सांगण्याची स्पर्धाच जणू लागली आहे. संविधानिक मुल्यांची समज अजून समाजात येण्यापेक्षा सवलतीची फळे खाण्यातच दंग झालेले लोक संविधानाचा मूल्य विचार अजून समजू शकलेले नाहीत. कॉलेज जीवनातील शिक्षणात कळत्या वयात फुले आंबेडकरी विचारांचा परिचय होतो ,अन्याय दूर करण्याची स्वप्ने पडू लागतात, अशा अन्यायाविरुद्ध आवाज उठवला की पारंपारिक जात व्यवस्थेचे सापळे लावले जातात. ज्याच्या न्यायासाठी आपण बोलतो,ते लोक देखील साथ देत नाहीत उलट अशा सत्य, सार्वजनिक हित आणि सामाजिक न्यायाचा आवाज उठवणारास कोंडीत पकडण्यासाठी प्रयत्न करीत राहतात. जनावराला फसवून सापळ्यात अडकवावे तसे अनेक प्रकारचे सापळे लावून हा आवाज थांबवण्याचा प्रयत्न होतो, यात प्रस्थापित असतात तसेच प्रस्थापित राजकीय व्यवस्थेचे हस्तक बनलेले आपले लोक असतात. ज्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आवाज असतो, तेच लोक रोजचे रोजगाराचे प्रश्न, जगण्याचे प्रश्न यांनी हैराण झाल्याने शब्दावर विश्वास न ठेवता रोज गरजा भागवणारे राजकारणी परवडले म्हणून आपल्याच वैचारिक चळवळीच्या पायावर कुऱ्हाड मारत राहतात.. ही वेदना दलित साहित्यात पोटतिडकीने आली होती, संघटन होत वैचारिक साहित्य संमेलने सुरु होती, पण १९९० नंतर विचार करणारे आणि शोषित समाज यांची फारकत करण्याचे प्रयत्न प्रस्थापित व्यवस्थेत झाले. त्यात प्रस्थापित धार्जिण्या साहित्य व संस्कृतीच्या संस्थांनी वर्तुळे तयार करून पुरोगामीत्व चेहऱ्यापुरते मर्यादित ठेवले पण शोषित समाजाला दिशा दिली नाही. साहित्य, पुरस्कार घेऊन व्यक्तिगत मान्यता घेऊन सवते सुभे करण्यात धन्यता मानु लागले. या काळात अविश्वास एवढा वाढला आहे की आपला कोण शत्रू कोण हे कळणार नाही एवढी सरमिसळ झाली आहे, अशा व्यक्तिगत प्रतिमेसाठी साहित्य लिहिण्याच्या काळात काळजात दुभंगलेपणाच्या कळा घेऊन अभिव्यक्ती करीत राहिलेच पाहिजे या निष्ठेने लेखन करणारे जे तरुण कवी आहेत, त्यात सातारा




पुस्तक परिचय

- प्रा. डॉ. सुभाष वाघमारे
मराठी विभाग प्रमुख,
छ. शिवाजी कॉलेज,
सातारा. मो. ९८९०७२६४४०

परिसरातील रोहित आवळे याची कविता स्वतःशी, समाजाशी संवाद करू पाहते आहे.कोणीच बळ देत नाही,आपले हरवले जातात तेंव्हा आपल्या जिवंत अस्तित्वाची रेषा आपल्याला ओढावी लागते.सध्या माणूस यांत्रिकपणे, संवेदनहीन जीवन जगत असून आपला जिवंतपणायासाठी तळमळीने रोहित आवळे कविता लिहित आहे. सापळा कवितासंग्रहातील त्याची कविता आत्मशोध घेणारी, जातिव्यवस्थेच्या सापळा समजून देणारी, बेगडी पुरोगामित्व उघडे पाडणारी जनावरांनी व्यवस्थेने लावलेली वेसण तोडली पाहिजे म्हणणारी, हुकुमशाही माज संविधानिक विचारांनी उतरवला पाहिजे असे सांगणारी आहे.

माणूस म्हणून आपली किंमत होण्यापेक्षा कोणत्या जातीचा, खालच्या की वरच्या , यावरून आपली किंमत या देशात होते, हे कवीचे भरीव दुःख आहे. सगळ्यांचा जन्म आईच्या पोटातून बाहेर पडताना नागवाच होतो, तरीही जातीवरूनच लोक किंमत करतात? हा प्रश्न मनोगतात रोहित व्यक्त करतो. 'सापळा' या कविता संग्रहात एकूण ४५ कविता आहेत.कवितांचा आशय खूप दमदार आहे. पाऊस आणि ती ही कविता प्रतीकात्मक आहे. पाऊस ही स्वातंत्र्याची प्रतिमा आहे. पावसाचा धर्म मोकळेपणे प्रेम करणे आहे. पण जातीपातीच्या चिखलात पावसाच्या मुक्त भावनांना तुडवून ती त्याची प्रेयसी निघून जाते ही मूक वेदना या कवितेत आहे. मुक्त जीवन जगावे सर्वांना वाटते पण जातीचे सापळे त्यांना कोंडून टाकतात. त्यातून निसर्ग धर्म देखील नाकारले जातात, एवढ्या अंधश्रद्धा या समाजाच्या डोक्यात आहेत. विविध रंगानी रंगपंचमी करायची यात मुक्तता आहे पण आज जातीने आणि धर्मांनी रंगांची देखील वाटणी केली आहे, त्यामुळे कवीजवळ रंग अपुरे आहेत त्यांचे चित्र त्याला मनसोक्त तयार करता येत नाही. व्यवस्थेतली विषमता दिसल्यावर तो माणसातली विषमता शोधिताना सांगायचा, पण त्याला बोलूच द्यायचे नाही यासाठी धर्मांध शक्ती विचार करतात आणि त्याचा खून करतात, किंवा त्यालाच मंत्री करून पुन्हा मी पूर्वाश्रमीचा हिंदूच आहे, असे म्हणायला लावतात. रोहित याचे प्रतीकात्मक वर्णन करतो ..

**निळ्याशार आभाळात, केसरी रंग दाटून येऊन**
**सूर्य मावळावा तसा तो मावळला**

...यातून परिवर्तनवादी प्रस्थापित कसा होऊन जातो हे ध्वनित केले आहे.आज समाज सुधारक का तयार होत नाहीत? या प्रश्नाचे उत्तर स्वतः शोधून आपापल्या जातीची आवड असल्याने जात प्रतिनिधी तेवढे तयार होतात ही खंत तो मांडतो. मात्र, जाती प्रतिनिधी न होता आम्ही भारतीय आहोत ,आणि भारतीय राहू हे आंबेडकर यांचे विधान त्याची प्रेरणा बनते.'युती' नावाची कविता अलीकडच्या काळात सत्तेसाठी युत्या होतात,लाभापुरती समता येते. अशी युती सामाजिक जीवनात केली जात नाही. त्यामुळे तो सवाल करतो की..

**राजकीय पक्षाच्या जशा धर्म, जाती, पंथ**
**वेगवेगळे असताना सत्तेसाठी युत्या**
**होतात तशा प्रत्यक्षात युत्या झाल्या**
**असत्या तर किती बरं झालं असतं.**
**पाटलाचा जावी कांबळे आणि**
**कांबळेचा मेहुणा फझल आणि त्याचा**
**साडू रोबर्ट झाला असता**

माणूस असण्याचे संदर्भ माणसाला कळावेत ही त्याची अपेक्षा आहे. माणसाला रंगरंगोटी करून सुंदर दिसता येत,तसे वेदनांचे नाही. वेदना अंधाराशी सरेंडर करतात. पैसा ज्यांनी अमाप मिळाला आहे तेच मागासवर्गीय म्हनवत आता लाभ घेतात हे तो सांगतो..

**त्यांच्या घरी तेवत आहे**
**प्रकाशाचा दिवा**
**नांदत आहे लक्ष्मी आणि संधी**
**ते म्हणतात आम्ही**
**मागासवर्गीय आहोत**
**जे करत आले**
**पिढ्या न पिढ्या शोषण**
**तेही म्हणताहेत,**
**आम्ही मागासवर्गीय आहोत**

जे कित्येक आयुष्य रक्त आटवतात ते कधी स्वतःला मागासवर्गीय नाही मानत. एकूणच रोहित आवळे यांची कविता आरक्षण, शोषण, इतिहास, जातीय भेदभाव, बेगडी पुरोगामित्व, देशाचे भांडवली दुश्मन, डॉ. आंबेडकर, यांच्या बद्दल बोलत राहते. बलात्काऱ्याचे एन्काउंटर झाले ते ठीक आहे, पण भोतमागे कुटुंबावर गावानेच अन्याय केला, त्यांचे एन्काउंटर कसे होणार हे प्रश्न तो ध्वनित करतो, आम्ही निर्मळ असूनही आमच्याविषयी इथे संशयाचा किडा वळवळत असतो, खोट्या इतिहासावर आम्हाला फेरी झाडाव्या लागतील. आमच्या जीवावर माज करायचे तुम्ही आता सोडून द्या. हुकुमशाहीला आता संविधानच उत्तर आहे हे सांगायला कवी कमी करत नाही. कवितेचा जन्म व्यवस्थेच्या अपमानकारक घटनांनी झालेला असून येणाऱ्या काळात असे अन्याय सहन करायचे नाहीत हा निर्धार कवितेत आहे. दारिद्र्यने समाज पिचलेला असला तरी शब्दांतून हिम्मत घेऊन पुढचा प्रवास करावाच लागेल,हे लावलेले सापळे समजून घ्यावे लागतील आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी वैचारिक जागृती करावीच लागेल.भावना आणि विचार यांचा समन्वय साधत या व्यवस्थेच्या पिंजरयात अडकलेल्या पक्षांनी मुक्त आकाशाकडे झेप घ्यायला हवी हे सांगणारी ही कविता आहे. रोहित या कवीचा पुढचा प्रवास अनेक गुलामगिरीत ठेवणारे सापळे तोडण्याचा असेल आणि भारतीयत्व रुजवण्याचा असेल अशी आशा करता येते. प्रतिमा पब्लिकेशन पुणे यांनी प्रकाशित केलेले हे पुस्तक ८० रुपये इतक्या किमतीचे आहे. नव्या तरुणांचे शब्द व्यवस्था परिवर्तनासाठी काम करत असतील तर आपली साथ हवीच. आपणही ही कविता वाचली पाहिजे आणि तिचे स्वागत केले पाहिजे. नवकवी रोहित आवळे ९८६०६५६६३५ यांना फोन करून त्यांचे पुस्तक आपण मिळवू शकाल.आणि त्यांना अधिक चांगले लिहिते होण्यासाठी रसिक म्हणून साथ द्याल ही मला आशा आहे.